**ARTICLES BY BRIG HEMANT MAHAJAN IN VARIOUS NEWS PAPERS**

## छोटी राष्ट्रे पण चिन विरोधी: भारताचे मात्र चीनशी नरमाईचे धोरण -06 NON 2013

दमदाटी करून चीनने आपल्याला बॉर्डर डिफेन्स कोऑपरेशन करारावर सही करावयास लावली.चीनने भारतीयाना व्हिसा नाकारायचा आणि भारताने मात्र चिनी नागरिकांसाठी पायघड्या घालायच्या हे भारतासाठी लज्जास्पद आहे. चिनी बनावटीची शस्त्रे मोठ्या प्रमाणात ईशान्य भारतातील बंडखोरांना दिली जात आहेत.मागच्या आठवड्यात चिनच्या सरकारी मुखपत्रात एक लेख प्रसिध झाला. या प्रमाणॆ पुढच्या काही वरषात चिन ६ मोठ्या लढाया लढू शकतो.त्यामधे एक लढाई भारताशी अरुणाचल प्रदेश करता होईल.आपण तयार असावे.

छोटी राष्ट्रे पण चिन विरोधी

चिनशी सिमाविवाद असणारे बाकीचे देश चिनशी कसे वागतात?चीनने पीत सागर, पूर्व व दक्षिण चीन सागर हे आपले क्षेत्र असल्याचे घोषित केले आहे. चीनच्या या घोषणेला भीक घालण्यास त्या भागातील छोटी राष्ट्रे पण तयार नाहीत. या सागरातील स्पार्टले व अन्य बेटांवर तसेच तेल क्षेत्रांवरही चीन एकतफीर् अधिकार सांगत आहे, पण त्याला फिलिपीन्स, व्हिएतनाम व अन्य आशिआन राष्ट्रांनी हरकत घेतली आहे.

ऑस्ट्रेलियातील कॉझर्वेटिव्ह नेते टोनी ऍबर्ट यांचे भारताशी मैत्रीचे घनिष्ठ नाते आहे. ऑस्ट्रेलियाला तीन वर्गातील देश महत्त्वाचे व जवळचे आहेत. पहिले शेजारी देश, दुसरे उत्तम व्यापारी संबंध असणारे , तिसरे व्यूहात्मक सहकारी म्हणून जवळचे ठरणारे देश. या तीनही वर्गात भारत बसतो.आपण ऑस्ट्रेलियाला पण आपल्या आघाडीत सामिल केले पाहीजे.

**भारताचा एक मित्र मंगोलिया**

चीन विरूध्द आघाडीमध्ये भारताचा एक मित्र आहे मंगोलिया. 30 लाख लोकसंख्या असणारे हे राष्ट्र चीनचे एक शेजारी राष्ट्र आहे. चीन आणि रशियाच्या मध्ये अडकलेल्या या देशाला समुद्रकिनारा नाही,यामुळे या देशाची अर्थव्यवस्था प्रचंड प्रमाणात चीनवर अवलंबून आहे. पण यामुळेच या देशाला चीनची भीती वाटते कारण मंगोलियाकडे प्रचंड प्रमाणात खनिज पदार्थांचा साठा आहे व चीन

मंगोलियाचे पदार्थ मातीमोलाच्या किंमतीत विकत घेतो. भारताने या देशाला आरोग्य, शिक्षण आणि इतर क्षेत्रात मदत करायला हवी, जेणेकरुन आपल्याला मंगोलियाकडून खनिज पदार्थ स्वस्त किमतीत विकत घेता येतील.

## चीनला रोकण्यासाठी फिलीपीन्सची मद्त

आतापर्यंत चीन विरूद्धच्या आघाडी मध्ये फिलीपीन्स या द्वीप समुहचा विसर पडलेला आहे. सध्या आशिया खंडात फिलीपीन्सची आर्थिक प्रगति चीन च्या पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर आहे. यामुळे पुढच्या काही वर्षात फिलीपीन्स जगात आर्थिक ताकदीत 13 व्या क्रमांकावर येऊ शकतो. सामरिक आणि भौगोलिकदृष्टया फिलीपीन्स हे अत्यंत मोक्याच्या ठिकाणी स्थित आहे. चीनच्या साउथ चायना चे सगळे सागरी मार्ग फिलीपीन्स आडवू शकते. जेणेकरून चीनला सुद्धा त्याची झळ बसते. दुसऱ्या महायुद्धात या सागरी क्षेत्रात अनेक महत्वाच्या लढाया लढल्या गेल्या. त्यानंतरच्या शीतयुद्धाच्या काळात अमेरिकेचा सर्वांत मोठा नौदलाचा तळ फिलिपीन्स च्या सुबिक बे मध्ये होता. पण 1990 च्या दशकानंतर हा नौदल तळ तेथून काढण्यात आला.

सध्या चीन आणि फिलिपीन्स मध्ये सागरी सीमाविवाद सुरू झाला आहे. सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात दोन महत्वाच्या घटना घडल्या. चीनने साउथ चायना सी मधील बेटांवर मालकी हक्काचा दावा केला होता. चीनची इच्छा होती की फिलीपीन्सच्या राष्ट्रपतींच्या चीन दौऱ्यावर फिलीपीन्सने युनायटेड नेशन्स मध्ये चीन विरूद्ध आरबिट्रेशन केस दाखल केली होती. आधी त्यांनी ही केस परत घ्यावी. यामुळे चीनला न घाबरता फिलीपीन्स नी उलट त्याच्या राष्ट्रपतीचा दौराच रद्द केला आणि पुढे जाऊन त्यांनी अमेरिकेचे डिफेन्स सेक्रेटरी चीफ हेगेलना फिलीपीन्सला बोलावले, चिनी नौदलाच्या आक्रमक हालचालींना शह देण्यास अमेरिकेचे नौदल पुन्हा फिलीपीन्समध्ये कार्यरत झाले. फिलीपीन्स हे निव्वळ अमेरिकेवर अवलंबून नाही. त्यांनी दुसऱ्या आशियाई देशाशी सुद्धा लष्करी संबंध वाढवले आहेत. जपानची मदत घेऊन फिलीपीन्सने आपले नौदलाची ताकद वाढवण्यास सुरूवात केली आहे. विएटनामचे संरक्षण मंत्री सुद्धा फिलीपीन्स मध्ये पोहचले. विएतनाम व फिलीपीन्स चे संरक्षण संबंध वाढणार आहेत. फिलीपीन्स भारताशी सुद्धा आपले संबंध वाढवू इच्छितो. भारताने याचा फायदा घेऊन चीनची आर्थिक घुसखोरी व लष्करी कुरघोडी विरूद्ध शह देण्यास फिलीपीन्स पुढे केलेल्या मैत्रीचा हाताचा त्वरित फायदा घ्यावा.

## चीनच्या 'एन्सर्कलमेंट'ला वेळीच प्रत्युत्तर

मालदीवमध्ये चीन पाणबुड्यांचाही एक तळ तयार करू पाहतोय.  चीनच्या 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' या धोरणाचाच तो भाग आहे. या धोरणानुसार, पाकिस्तानातील बलुचिस्तानात ग्वादर बंदर, म्यानमारमध्ये कोको आयलंड  व  सितवे  बंदर,श्रीलंकेत हंबनटोटा बंदर, बांगलादेशात चितगाव ही बंदरे चीनने आपले हितसंबंध जपण्यासाठी विकसित केली आहेत.

त्यामुळे चीनच्या 'एन्सर्कलमेंट'ला भारताने वेळीच प्रत्युत्तर दिले पाहिजे. मालदीव, मादागास्कर, तसेच सेशेल्सबरोबर असलेल्या संबंधात वाढ करणे, मलेशिया,  जपान, तैवान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया यांच्याशी विशेष संबंध प्रस्थापित करणे यांसारख्या उपाययोजना भारत करू शकतो. चीनभोवती भारतानेही आपला विळखा मजबूत करणे गरजेचे आहे. हा महासागर 'इंडियन ओशन' म्हणून ओळखला जातो; 'चायना ओशन' म्हणून नव्हे. आपणही सदैव डोळ्यांत तेल घालून हिंदी महासागरावरचं आपले  राष्ट्रहित जपायला हवं.

भारताचे दक्षिण चीन उपसागराबद्दल काय धोरण असावे? भारताचा चीनबरोबर आधीच सीमावाद आहे; त्यात आपल्या देशापासून दूर असलेल्या प्रदेशात का म्हणून उगीचच वाद वाढवावा? चीनशी मैत्री ठेवली तरच आपण अधिक प्रगती करू शकू  का?. चीनशी आपल्याला अनेक स्तरावर लढाई करावी लागेल.जर चीन आपल्या शेजारी येउन आपल्याला त्रास देउ शकतो तर आपण पण ही लढाई आपण साउथ चायना सीमधे  नेली  पाहिजे.

**<u>आपण  काय  करावे</u>**

बाकी देशापैकी भारताची कुरापत काढणे सोपे, असे चीनला वाटते. हा समज भ्रामक आहे, याची जाणीव करून देण्यासाठी तरी भारताने  धैर्य दाखविले पाहिजे. आपण चीनच्या लष्करी सामर्थ्यावर अंतराळातून, आकाशातून, जमिनीवरून, समुद्रातून आणि सायबर स्पेस मधून लक्ष ठेवले पाहिजे. यामध्ये आपल्याला अमेरिका व चीनच्या शत्रूंची मदत घेता येईल. पाकीस्तान,चिन आणी आपल्या  सीमांमधील घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी आपल्याला अनेक उपग्रह,युएव्ही,एरोस्टट रडार  हवे आहेत. चीनचे शत्रू हे आपले मित्र

आहेत. म्हणून आपण जपान, व्हिएटनाम, तैवान, फिलीपिन्स, ऑस्ट्रेलिया, मंगोलिया यांच्याशी सामरिक संबंध आणि लष्करी सहकार्य वाढवले पाहिजे. जेणेकरून चिनी सैन्याला वेगवेगळ्या आघाड्यावर लक्ष द्यावे लागेल.

## चीनच्या पुढे नेहमीच गुडघे टेकले:परराष्ट्र धोरणावर शांततावादी विचारवंतांची पकड -22 OCT 2013

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग २२-२४ ऑक्टोंबर चीनच्या दौर्यावर होते. त्यामधून काय निष्पन्न झाले? गेल्या १० वर्षांतील त्यांची चीनच्या वेगवेगळ्या पंतप्रधानांबरोबरची ही १७ वी भेट होती. चीनच्या आक्रमक वागणुकीमुळे भारती -चीन संबंध सध्या सर्वात खालच्या पातळीवर पोहचले आहेत. या भेटीमध्ये चीन भारतामधील खर्या समस्या, जसे की सीमा विवाद, भारतीय सिमेमध्ये घुसखोरी, पाकिस्तानला शस्त्र आणि अणुशस्त्र पुरवठा, भारताच्या शेजारील देशांमध्ये मिलीटरी बेसेस किंवा टेहाळणी कैंद्रे उघडणे, आपल्या देशातील आर्थिक घुसखोरी यावर अजिबात चर्चा झाली नाही.

### दमदाटी करून बॉर्डर डिफेन्स कोऑपरेशन करारावर सही

चीनला भारताला दमदाटी करून फक्त बॉर्डर डिफेन्स कोऑपरेशन करारावर भारताला सही करायला भाग पाडायचे होते. या कराराचे मुख्य कलम आहे की यापुढे भारताला आपल्या सीमा भागात नवीन रस्ते कि लढाईकरता बंकर(खंदक) बनवता येणार नाहीत. चीनने पहिलेच रस्ते सीमेपर्यंत आणून पोहचवले आहेत. आपले रस्ते मात्र, अजुन सीमेपासून २०-४० किलो मिटर मागे आहेत.म्हणूनच या करारामुळे आपले फ़ार नुकसान होणार आहे.

काही महिन्यापुर्वी लडाखच्या देवसांग भागात चीनने १९ कि.मी. आत घुसखोरी केली होती. केवळ ५० जवानांच्या ताकदीवर त्यांनी आपल्याला गुडघे टेकवायला भाग पाडले. आपले सरंक्षण मंत्री अँथनी आणि नशॅनल सेक्युरिटी अॅडव्हायसर (NSA) शिवशंकर मेनन, घाईघाईत चीनमध्ये गेले आणि आम्ही (BDCA) वर विचार आणि सही करू असे अलिखीत आश्वासन देऊन परत आले. चीनचे पंतप्रधान भारतात आले असतांना सुद्धा आपली चिनी घुसखोरी बद्दल बोलायची हिम्मत झाली नाही. एक गोळी न फायर करता केवळ दमदाटीच्या जोरावर चीनने आपल्याला त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागण्यास भाग

पाडले.

आता पंतप्रधान चीनला जाऊन त्यांच्या दमदाटीला पुर्णपणे बळी पडत आहेत. १९६२ साली आपली सीमा परराष्ट्र खात्याच्या अधिपत्याखाली होती आणि आपण सिमेवर काही ठिकाणी पोलिसांच्या तुकड्या तैनात केल्या होत्या. आता पण तेच होत आहे. आपण आक्रमक चिनी सैनिकांच्या समोर गृहमंत्रालयाखालील आयटीबिपी पोलिस तैनात करत आहोत. या माघारीमुळे चीन अजुन आक्रमक होत आहे.तिबेटमध्ये ब्रह्मपुत्रा नदीवर चीन अनेक धरणे बांधत आहे आपण मात्र निषेध खलीते पाठविण्याशिवाय काहीच करत नाही.

## <u>आपल्या निषेधांस कोणीही भीक घालत नाही</u>

य़ा दौर्यामध्ये चीनला आपल्याला बोर्डर डिफ़ेन्स कोओपरेशन करारावर{BORDER DEFENSE COOPERATION AGREEMENT(B D C A)} सही करायला भाग पाडले.लेख लिही पर्यंत कराराची मुख्य पैलु जाहीर झाले नव्हते.कराराचे मुख्य कलम असावे की यापुढे आपल्याला सीमा भागात नवीन रस्ते बांधता येणार नाही. चिनचे रस्ते ,रेल्वे, ओईल पाइप लाइन सीमेपर्यंत पोहचले आहे.आपल्या सुस्त कारभारामुळे आपले रस्ते मात्र सीमेपासून मागेच आहेत. म्हणजेच पुढे लढत असलेल्या सैन्याला रसद पोहोचवण्यास आपण अजूनही असमर्थ राहणार आहोत.शिवाय चीनने रेल्वेलाईनचे जाळे तिबेटमध्ये पूर्ण पसरले आहे व पेट्रोलियम प्रॉडक्टकरता मोठी पाईपलाईन सुद्धा तयार केली आहे. ह्या उलट भारतीय रेल आसामच्या ब्रह्मपुत्रेच्या पात्रातच म्हणजे सीमेपासून शेकडो कि. मी. मागे रुतून राहिली आहे. थोडक्यात चीनने लष्करी कारवायांसाठी सर्व योग्य त्या सुविधांचे जाळे तयार करून ठेवले आहे. १९६२ च्या चिनी आक्रमणाला २०/१०/२०१३ पासुन ५१ वर्ष सुरु झाले. भारताचा निषेध अगदीच गुळमुळीत राहिलेला आहे. आपल्या निषेधांस कोणीही भीक घालत नाही.

भारत व भूतान ही एकमेव अशी राष्ट्रे आहेत, ज्यांच्याबरोबर चीनचे सीमाप्रश्न सुटलेले नाहीत. आतापर्यंतच्या 19 चर्चांमधून काही निष्पन्न झाले नाही,१९०० चर्चांमधून सुधा काही निष्पन्न होणार नाही . जेव्हा चीनला वाटेल की, भारताने चीनचे प्रभुत्व मान्य केले आहे, तेव्हाच चीन हे प्रश्न सोडवेल.

लष्कराचा विरोध असूनही सरकारी आदेशामुळे भारतीय संरक्षण दलाने चुमार येथील बंकर तोडण्याचा निर्णय घेतला. ज्या चिन्यांनी घुसखोरी केली, त्यांना मागे ढकलायचे सोडून, आपले सैन्यच आपल्याच प्रदेशात मागे घेणे ही कोठली राजनीती? राजकीय पक्ष काहीच का बोलत नाही ? चीनमध्ये नवे नेतृत्व आल्यानंतर शिरस्त्याप्रमाणे नवे अध्यक्ष शी जिंगपिंग यांनी भारताशी मैत्री करण्याची भाषा केली.चीनला भारताची बाजारपेठ हवी आहे, मात्र मैत्री नको.व्यापार वाढवला की चीनचा आक्रमकता नाहिशी होईल का?

**चीन दौरा रद्द करावयास हवा होता**

पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी वास्तविक, आपला २२-२४/१०/२०१३चा चीन दौरा रद्द करावयास हवा होता.भारताला अडचणीत आणण्याची एकही संधी चीन दवडत नाही. अरुणाचलातील दोन खेळाडूना स्पर्धेसाठी व्हिसा देण्याचा मुद्दा असो वा पाकिस्तानला अणुभट्टय़ा पुरवण्याचा. चीन कोणालाही भीक घालत नाही.पंतप्रधान मनमोहन सिंग हे अधिकृत दौऱ्यासाठी चीनमध्ये येणार हे माहीत असताना चीनने हा उद्योग केला. अणुऊर्जा निर्मितीसंदर्भातील सर्व कायदेकानून आणि आंतरराष्ट्रीय संकेत बाजूला सारून चीनने पाकिस्तानला अणुभट्टय़ा देण्याचा चंग बांधला आहे. पाकिस्तानचे यांचे चोरटे अणुउद्योग चीनच्याच सहकार्याने सुरू आहेत.या कुरापती चीनच्या आहेत . यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी वास्तविक, आपला चीन दौरा रद्द करावयास हवा होता.आंतरराष्ट्रीय संबंधांत फक्त स्वहिताचाच विचार असतो. पाकिस्तानसाठी दोन मोठय़ा अणुभट्टय़ा उभारून देण्याचे चीनचे काम हे याच हितसंबंधांचे निदर्शक आहे.

दोन आठवडे आधी अरुणाचल प्रदेशातील दोन खेळाडूंना व्हिसा देण्याचे चीनने नाकारले. का? तर चीनच्या मते अरुणाचल हा चीनचाच भाग आहे त्यामुळे त्या प्रदेशातील व्यक्तींना व्हिसा देण्याची गरज नाही. या दोन्ही घटनांनंतर आपण फक्त निषेध नोंदवला.आपण मात्र पंतप्रधानांच्या चीन दौऱ्यात उभय देशांतील व्हिसा नियम शिथिल करण्यासंदर्भात करार होणार हो्तो.

गेले सहा-सात महिने चीन हा सातत्याने आपल्या विरोधात कारवाया करीत असून भूप्रदेश बळकावण्यापासून अनेक उचापती त्या देशाने केल्या आहेत. कोणी महत्त्वाचा चिनी नेता भारतात येणार असताना, भारतीय नेत्याचा चीन दौरा

तोंडावर आलेला असताना वा उभय देशांतील महत्त्वाच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर चीनकडून हे उद्योग केले जातात. आताही पंतप्रधान मनमोहन सिंग महत्त्वाच्या दौऱ्यासाठी चीनला भेट देणार असतानाच चीनचे उद्योग समोर आले.

**<u>वेन जिआ बाओ,केचियांग यांच्या भेटीतून अपेक्षाभंग</u>**

चीनचे पंतप्रधान वेन जिआबाओ भारताच्या भेटीवर आले होते. भारत-चीनी भाई भाईचा परत एकदा नारा देताना, चिनची नजर दोन्ही देशांदरम्यानचा व्यापार ४० अब्ज डॉलर्सने वाढविण्यावर होती. डॉ. मनमोहन सिंग यांच्यासोबत गेल्या काही वर्षांत ११ वेळा बैठका घेणारे चीनचे पंतप्रधान वेन जिआबाओ पुन्हा एकदा भारत भेटीवर येऊन गेले. तेव्हा त्यांच्याकडून भारतीयांना फार अपेक्षा नव्हत्या. चीनने चालविलेल्या खोड्या बंद कराव्यात अशी एक अपेक्षा होती. या अपेक्षेचे खापर त्यांनी भारतीय प्रसारमाध्यमांच्या माथी फोडले आणि चीन खोड्या करत नाही, भारतीय प्रसारमाध्यमेच तसे चित्र निर्माण करतात, असे अंग काढून घेत त्यांनी काढता पाय घेतला.त्यांच्या ११ भेटीचा काहीच फ़ायदा झाला नाही. ऊलटी चिनी आयात जास्त वाढल्यामुळे रुपयाची किम्मत घसरली आणी महागाई वाढली.

चीनच्या पंतप्रधानपदावरून वेन जिआ बाओ गेले आणि केचियांग आले, याचे आपल्याला कौतुक होते. चीनने घुसखोरी केलेली असताना आपले परराष्ट्रमंत्री सलमान खुर्शीद हे चीनला जाण्यासाठी उतावीळ होते.त्यानी चीनच्या सैनिकांनी केलेल्या घुसखोरीचा मुद्दा उपस्थितदेखील केला नाही! चीनच्या नाराजीमुळे भारताने जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यासोबतचा परंपरागत युद्धाभ्यास टाळला.इतके घाबरणे बरोबर आहे का? भारताचा स्वाभिमान आणि सैनिकांच्या मनोबलाचा विचार केला आहे का?.जुन २०१३ मध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार शिवशंकर मेनन हेही चीनला गेले आणी हात हलवत परत आले. भारताला एकीकडे सहकार्याचे, व्यापारवाढीचे गाजर दाखवायचे आणि दुसरीकडे सतत दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न करायचा. नवे नेतृत्व आले म्हणून त्यात कोणताही बदल झालेला नाही.

<u>जपान व्हिएतनाम कसे वागतात?</u>

आशियात जपान व भारत हे चीनला आपले प्रतिस्पर्धी वाटतात. जपानशी

कुरापत काढली आणी जपाननी आपले एयरफ़ोर्स अलर्ट केले.चीनने व्हिएतनामवर दबाव टाकला, व्हिएतनामने आपला शत्रू असलेल्या अमेरिकेशी मैत्री प्रस्थापित केली.लडाखमधील चिनी लष्करी अतिक्रमणाला, छोटे समजणे धोकादायक ठरणार आहे. असे प्रोत्साहन मिळत राहिले, तर घुसखोरीबाबत चीनला काळजी करण्याचे कारणच उरणार नाही. तिन्हीं देशापैकी भारताची कुरापत काढणे सोपे, असे चीनला वाटते. हा समज भ्रामक आहे, याची जाणीव करून देण्यासाठी तरी भारताने धैर्य दाखविले पाहिजे.

चीनच्या 'एन्सर्कलमेंट'ला भारताने वेळीच प्रत्युत्तर दिले पाहिजे. मालदीव, मादागास्कर, तसेच सेशेल्सबरोबर असलेल्या संबंधात वाढ करणे, जपान, तैवान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया यांच्याशी विशेष संबंध प्रस्थापित करणे यांसारख्या उपाययोजना भारत करू शकतो. चीनभोवती भारतानेही आपला विळखा मजबूत करणे गरजेचे आहे.

**परराष्ट्र धोरणावर शांततावादी विचारवंतांची पकड**

आज इन्दीरा गांधी,सरदार वल्लभभाई पटेल यांसारखे एखादे खंबीर भूमिका घेणारे आणि कोणत्या परिणामाला सामोरे जाण्याची ताकद असणारे नेते असावेत .त्यासाठी प्रखर राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. अशी इच्छाशक्ती निर्माण होण्यासाठी जनतेनेच सरकारवर दबाव टाकायला हवा. चीनच्या घुसखोरीच्या विरोधात जनतेनेही उत्स्फूर्तपणे तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करायला हव्यात. संपूर्ण देशात चीनच्या विरोधात वातावरण निर्माण व्हायला हवे. चिनी बनावटीच्या वस्तूंवर बहिष्कार टाकायला हवा. अशा वस्तू विकणार्यांना देशद्रोही मानायला हवे. व्यापार ही चीनची सर्वात मोठी आर्थिक शक्ती आहे . त्यामुळे या देशात चिनी वस्तुंच्या व्यापारावर निर्बंध आले तर ते चीनला परवडण्यासारखे नाही.त्यादृष्टीने जनता विचार करेल ही आशा आहे.जर तुम्हाला युद्ध टाळायचं असेल तर युद्धाकरता सक्षम व सज्ज राहा .सामर्थ्य निर्माण करण्याची गरज आहे. चीनचा उद्देश/हेतू कधीही बदलू शकतो.

## जपान व्हिएतनाम चीनशी कसे वागतात?

## पूर्व आशियातील राष्ट्रांशी मैत्री संबंध मजबूत करणे महत्वाचे -15 OCT 3013

मागच्या रविवारी आपण चीनच्या पुढे कसे गुडघे टेकले हे बघितले.दमदाटी करून चिनने आपल्याला बॉर्डर डिफेन्स कोऑपरेशन करारावर सही करावयास लावली.चीनने भारतीयाना व्हिसा नाकारायचा आणि भारताने मात्र चिनी नागरिकांसाठी पायघड्या घालायच्या हे भारतासाठी लज्जास्पद आहे.चीनच्या स्टॅपल व्हिसामुळे अरुणाचल प्रदेशच्या अनेक नागरिकांना अपमानित व्हावे लागते, चिनी बनावटीची शस्त्रे मोठ्या प्रमाणात इशान्य भारतातील बंडखोरांना दिली जात आहेत.चीनला भारतासोबत फक्त व्यापार हवा आहे.चीन दौर्‍याने काय साधले? परिस्थिती जैसेथेच राहणार आहे.

चीनने व्हिएतनामवर दबाव टाकला होता, परिणाम झाला की, व्हिएतनामने आपला शत्रू असलेल्या अमेरिकेशी मैत्री प्रस्थापित केली. आता व्हिएतनामने दक्षिण चीन सागरात अमेरिकन आरमार ठेवण्यास अनुकूलता दर्शविण्यास सुरुवात केली आहे. चीनने पीत सागर, पूर्व व दक्षिण चीन सागर हे आपले क्षेत्र असल्याचे घोषित केले आहे. चीनच्या या घोषणेला भीक घालण्यास त्या भागातील छोटी राष्ट्रे तयार नाहीत. या सागरातील स्पार्टले व अन्य बेटांवर तसेच तेल क्षेत्रांवरही चीन एकतर्फी अधिकार सांगत आहे, पण त्याला फिलिपीन्स, व्हिएतनाम व अन्य आशिआन राष्ट्रांनी हरकत घेतली आहे.

**चीनच्या मग्रुरीला जपानचे चोख उत्तर**

आशियात जपान व भारत हे चीनला आपले प्रतिस्पर्धी वाटतात. जपानशी कुरापत काढली आणी जपाननी आपले एयरफ़ोर्स अलर्ट केले.आपल्या लष्करी सामर्थ्या-च्या बळावर शेजारी राष्ट्राशी सतत संघर्ष आणि कुरापती काढणाऱ्या चीनला जपानने मात्र चोख प्रत्युत्तर द्यायचे धाडस दाखवले आहे. व्हिएतनाम, ब्रह्मदेश, भारतासह चिनी लष्कराच्या आंतरराष्ट्रीय सीमेवर सातत्याने कारवाया, घुसखोऱ्या सुरूच असतात. अत्याधुनिक लष्कराच्या बळावर शेजारी राष्ट्रांना नमवायची चीनची भाषा काही नवी नाही. चीनच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य धोरणच साम्राज्यवादी असल्याने, शेजारी

राष्ट्रांच्या भूमीवर हक्क सांगून घुसखोऱ्या करतो.

प्रशांत आणि हिंदी महासागरावर आपले वर्चस्व निर्माण व्हावे, यासाठीही चीनने आपले नौदल अत्याधुनिक केले आहे. भारतीय सीमेवर तर चिनी लष्कराची घुसखोरी कायमचीच सुरू आहे. एकीकडे शांततेची भाषा बोलायची आणि त्याचवेळी इंचा इंचाने शेजारी राष्ट्रांची भूमी बळकवायची, हा चिनी सरकारचा खाक्या आहे.  भारत चीनशी नरमाईने वागतो. पण, चीनच्या अफाट लोकसंख्या आणि लष्करी सामर्थ्याला न घाबरता, साम्राज्यवादी धोरणाला रोखायची हिंमत आपल्या देशाकडे आहे आणि वेळ आल्यास आमची युद्धाचीही तयारी आहे, अशा भाषेत बजावत जपानचे पंतप्रधान शिंजो अबे यांनी अलीकडेच जाहीरपणे, चिनी सत्तेलाही आव्हान दिले आहे.

**<u>सेनकाकू बेटावरही चीनचा  हक्क</u>**

चीन आणि जपानची सीमारेषा काही परस्परांना लागून नाही. प्रशांत महासागरातल्या काही बेटांवर आपलाच हक्क सांगत जपानला दरडवायचे सत्र चीनने सुरू केले. जपानजवळच्या निर्जन, ओसाड आणि छोट्या सेनकाकू बेटावर चीनने आपला हक्क सांगायला सुरुवात करून, जपानशी संघर्ष सुरू केला. जपानी नागरिकांनी या बेटावर उतरून आपला हक्क प्रस्थापित केल्याने चिनी राज्यकर्ते खवळले. जपानला त्यांनी धमक्या द्यायला सुरुवात केली. काही महिन्यांपूर्वी चीनने आपल्या नौदलाचा ताफा त्या बेटाच्या परिसरात पाठवला होता. तेव्हा जपानी नौदलानेही आपला ताफा त्या बाजूला पाठवला. तेव्हा परस्परात संघर्ष झाला नाही. पण, चीनने जपानला लष्करी सामर्थ्यावर धडा शिकवायची मग्रुरीची भाषा सुरू करताच, जपानी सत्ताधिशांनी त्याच भाषेत प्रत्युत्तर द्यायचे आक्रमक धोरण स्वीकारले आहे. आमच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आमची भूमी बळकवायचा चीनने प्रयत्न केल्यास, तो चालू दिला जाणार नाही. चीन युद्धाच्या मार्गाने असे दु:साहस करणार असेल, तर जपानी नौदल आणि लष्कर युद्धालाही तयार असल्याचे अबे यांनी जाहीरपणे सांगितले आहे. जगातली तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महाशक्ती असलेल्या जपानकडून जगाच्या खूप अपेक्षा आहेत. आशियाई भागात प्रशांत महासागराच्या सुरक्षा धोरणातही जपानने आपले सामर्थ्य वाढवले पाहिजे, असे जपानी जनतेला वाटते आहे, असेही अबे म्हणाले आहेत.

सेनकाकू बेटावर हक्क सांगणाऱ्या चीनने ते बळकवायचा केलेला प्रयत्न जपानने वारंवार हाणून पाडल्यामुळे, चिनी सत्ताधीशांचा चडफडाट सुरू आहे.

**<u>पूर्व आशियाई देश भयभीत</u>**

चीन हिंदी महासागरापर्यंत आपला हक्क सांगत असल्याने, पूर्व आशियाई देश भयभीत झाले आहेत. भारताच्या तुलनेने छोट्या असलेल्या जपानने चिनी राज्यकर्त्यांच्या आक्रमक धोरणासमोर नरमाईने धोरण न स्वीकारता जशास तसेच उत्तर देत चीनच्या साम्राज्यवादी धोरणाला रोखायच्या सुरू केलेल्या मोहिमेची गंभीर दखल केंद्र सरकारने घ्यायला हवी. शांततेच्या गावगप्पा मारत चीनसमोर झुकते धोरण स्वीकारणाऱ्या भारतानेही असाच आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे चीनची आक्रमक वागणुक कमी होऊ शकते..हाच अबे यांनी स्वीकारलेल्या धोरणाचा धडा आहे.लडाखमधील चिनी लष्करी अतिक्रमणाला, छोटे समजणे धोकादायक ठरणार आहे. असे प्रोत्साहन मिळत राहिले, तर घुसखोरीबाबत चीनला काळजी करण्याचे कारणच उरणार नाही. तिन्हीं देशापैकी भारताची कुरापत काढणे सोपे, असे चीनला वाटते. हा समज भ्रामक आहे, याची जाणीव करून देण्यासाठी तरी भारताने धैर्य दाखविले पाहिजे.

## पूर्व आशियातील राष्ट्रांशी मैत्री संबंध महत्वाचे

चीन ज्या देशांना आपले प्रभावक्षेत्र मानतो अशा दक्षिण, दक्षिणपूर्व आशियाई तसेच पूर्व आशियातील राष्ट्रांशी पारंपरिक मैत्री संबंध मजबूत करून भारताने प्रत्युत्तर द्यायला हवे.भारतासाठी आता अमेरिका किंवा युरोपपेक्षाही, पूर्व आशिया, जपान, कोरियाचे लष्करी आणि आर्थिकसामर्थ्य महत्त्वाचे ठरणार आहेत.चीनला उत्तर देण्यासाठी भारताला स्वत:च्या 'खऱ्या' मित्रांची फळी उभी करावी लागेल. चीनचे कुणी 'खरे' मित्र नाहीत. म्यानमार, व्हिएतनाम व तैवानसुद्धा चीनच्या विस्तारवादी मनसुब्यांमुळे चिंतित आहेत.पूर्वेत जपानशी आर्थिक व व्यूहात्मक संबंध वाढवावे लागतील.

## चीनच्या पुढे नेहमीच गुडघे टेकले

पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी वास्तविक, आपला २२-२४/१०/२०१३चा चीन दौरा रद्द करावयास हवा होता.भारताला अडचणीत आणण्याची एकही संधी चीन दवडत नाही. अरुणाचलातील दोन खेळाडूना स्पर्धेसाठी व्हिसा देण्याचा मुद्दा असो वा पाकिस्तानला अणुभट्ट्या पुरवण्याचा. चीन कोणालाही भीक घालत नाही.पंतप्रधान मनमोहन सिंग हे अधिकृत दौऱ्यासाठी चीनमध्ये येणार हे माहीत असताना चीनने हा उद्योग केला. अणुऊर्जा निर्मितीसंदर्भातील सर्व कायदेकानून आणि आंतरराष्ट्रीय संकेत बाजूला सारून चीनने

पाकिस्तानला अणुभट्टय़ा देण्याचा चंग बांधला आहे. पाकिस्तानचे यांचे चोरटे अणुउद्योग चीनच्याच सहकार्याने  सुरू आहेत.या कुरापती चीनच्या आहेत . यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी वास्तविक, आपला चीन दौरा रद्द करावयास हवा होता.आंतरराष्ट्रीय संबंधांत फक्त स्वहिताचाच विचार असतो. पाकिस्तानसाठी दोन मोठय़ा अणुभट्टय़ा उभारून देण्याचे चीनचे काम हे याच हितसंबंधांचे निदर्शक आहे.

दोन आठवडे आधी अरुणाचल प्रदेशातील दोन खेळाडूंना व्हिसा देण्याचे चीनने नाकारले. का? तर चीनच्या मते अरुणाचल हा चीनचाच भाग आहे त्यामुळे त्या प्रदेशातील व्यक्तींना व्हिसा देण्याची गरज नाही. या दोन्ही घटनांनंतर आपण फक्त निषेध नोंदवला.आपण मात्र पंतप्रधानांच्या चीन दौऱ्यात उभय देशांतील व्हिसा नियम शिथिल करण्यासंदर्भात करार होणार हो्तो.

गेले सहा-सात महिने चीन हा सातत्याने आपल्या विरोधात कारवाया करीत असून भूप्रदेश बळकावण्यापासून अनेक उचापती त्या देशाने केल्या आहेत. कोणी महत्त्वाचा चिनी नेता भारतात येणार असताना, भारतीय नेत्याचा चीन दौरा तोंडावर आलेला असताना वा उभय देशांतील महत्त्वाच्या चर्चेच्या पाश्र्वभूमीवर चीनकडून हे उद्योग केले जातात. आताही पंतप्रधान मनमोहन सिंग महत्वाच्या दौऱ्यासाठी चीनला भेट देणार असतानाच चीनचे उद्योग समोर आले.

**<u>वेन जिआ बाओ,केचियांग यांच्या भेटीतून  अपेक्षाभंग</u>**

चीनचे पंतप्रधान वेन जिआबाओ भारताच्या भेटीवर आले होते. भारत-चीनी भाई भाईचा परत एकदा नारा देताना, चिनची नजर दोन्ही देशांदरम्यानचा व्यापार ४० अब्ज डॉलर्सने वाढविण्यावर होती. डॉ. मनमोहन सिंग यांच्यासोबत गेल्या काही वर्षांत  ११ वेळा बैठका घेणारे चीनचे पंतप्रधान वेन जिआबाओ पुन्हा एकदा भारत भेटीवर येऊन गेले. तेव्हा त्यांच्याकडून भारतीयांना   फार अपेक्षा नव्हत्या. चीनने चालविलेल्या खोड्या बंद कराव्यात अशी एक अपेक्षा होती. या अपेक्षेचे खापर त्यांनी  भारतीय प्रसारमाध्यमांच्या माथी फोडले आणि चीन खोड्या करत नाही, भारतीय प्रसारमाध्यमेच तसे चित्र निर्माण करतात, असे अंग काढून घेत त्यांनी काढता पाय घेतला.त्यांच्या ११ भेटीचा काहीच फ़ायदा झाला नाही. ऊलटी चिनी आयात जास्त वाढल्यामुळे रुपयाची किम्मत घसरली आणी महागाई वाढली.

चीनच्या पंतप्रधानपदावरून वेन जिआ बाओ गेले आणि केचियांग आले, याचे आपल्याला कौतुक होते. चीनने घुसखोरी केलेली असताना आपले परराष्ट्रमंत्री सलमान खुर्शीद हे चीनला जाण्यासाठी उतावीळ होते.त्यानी चीनच्या सैनिकांनी केलेल्या घुसखोरीचा मुद्दा उपस्थितदेखील केला नाही!  चीनच्या नाराजीमुळे भारताने जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्यासोबतचा परंपरागत युद्धाभ्यास टाळला.इतके घाबरणे बरोबर आहे का? भारताचा स्वाभिमान आणि सैनिकांच्या मनोबलाचा विचार केला आहे का?.जुन २०१३ मध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार शिवशंकर मेनन हेही चीनला गेले आणी हात हलवत परत आले. भारताला एकीकडे सहकार्याचे, व्यापारवाढीचे

गाजर दाखवायचे आणि दुसरीकडे सतत दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न करायचा. नवे नेतृत्व आले म्हणून त्यात कोणताही बदल झालेला नाही.

**<u>बोर्डर डिफ़ेन्स कोओपरेशन करारावर सही?</u>**

य़ा दौर्यामध्ये चीनला आपल्याला बोर्डर डिफ़ेन्स कोओपरेशन करारावर{BORDER DEFENSE COOPERATION AGREEMENT(B D C A)} सही करायला भाग पाडायचे आहे.कराराचे मुख्य कलम आहे की यापुढे आपल्याला सीमा भागात नवीन रस्ते बांधता येणार नाही. चिनचे रस्ते ,रेल्वे, ओईल पाइप लाइन सीमेपर्यंत पोहचले आहे.आपल्या सुस्त कारभारामुळे आपले रस्ते मात्र सीमेपासून ३०-४० मैल मागेच आहेत. म्हणजेच पुढे लढत असलेल्या सैन्याला रसद पोहोचवण्यास आपण अजूनही असमर्थ राहणार आहोत.शिवाय चीनने रेल्वेलाईनचे जाळे तिबेटमध्ये पूर्ण पसरले आहे व पेट्रोलियम प्रॉडक्टकरता मोठी पाईपलाईन सुद्धा तयार केली आहे. ह्या उलट भारतीय रेल आसामच्या ब्रह्मपुत्रेच्या पात्रातच म्हणजे सीमेपासून शेकडो कि. मी. मागे रुतून राहिली आहे. थोडक्यात चीनने लष्करी कारवायांसाठी सर्व योग्य त्या सुविधांचे जाळे तयार करून ठेवले आहे. १९६२ च्या चिनी आक्रमणाला २०/१०/२०१३ पासुन ५१ वर्ष सुरु झाले. भारताचा निषेध अगदीच गुळमुळीत राहिलेला आहे. आपल्या निषेधांस कोणीही भीक घालत नाही.

भारत व भूतान ही एकमेव अशी राष्ट्रे आहेत, ज्यांच्याबरोबर चीनचे सीमाप्रश्न सुटलेले नाहीत. आतापर्यंतच्या 19 चर्चांमधून काही निष्पन्न झाले नाही,१९०० चर्चांमधून सुधा काही निष्पन्न होणार नाही . जेव्हा चीनला वाटेल की, भारताने चीनचे प्रभुत्व मान्य केले आहे, तेव्हाच चीन हे प्रश्न सोडवेल.

लष्कराचा विरोध असूनही सरकारी आदेशामुळे भारतीय संरक्षण दलाने चुमार येथील बंकर तोडण्याचा निर्णय घेतला. ज्या चिन्यांनी घुसखोरी केली, त्यांना मागे ढकलायचे सोडून, आपले सैन्यच आपल्याच प्रदेशात मागे घेणे ही कोठली राजनीती? राजकीय पक्ष काहीच का बोलत नाही ? चीनमध्ये नवे नेतृत्व आल्यानंतर शिरस्त्याप्रमाणे नवे अध्यक्ष शी जिंगपिंग यांनी भारताशी मैत्री करण्याची भाषा केली.चीनला भारताची बाजारपेठ हवी आहे, मात्र मैत्री नको.व्यापार वाढवला की चीनचा आक्रमकता नाहिशी होईल का?

**<u>जपान व्हिएतनाम कसे वागतात?</u>**

आशियात जपान व भारत हे चीनला आपले प्रतिस्पर्धी वाटतात. जपानशी कुरापत काढली आणी जपाननी आपले एयरफ़ोर्स अलर्ट केले.चीनने व्हिएतनामवर दबाव टाकला, व्हिएतनामने आपला शत्रू असलेल्या अमेरिकेशी मैत्री प्रस्थापित केली.लडाखमधील चिनी लष्करी अतिक्रमणाला, छोटे समजणे धोकादायक ठरणार आहे. असे प्रोत्साहन मिळत राहिले, तर घुसखोरीबाबत चीनला काळजी करण्याचे कारणच उरणार नाही. तिन्हीं देशापैकी भारताची कुरापत काढणे सोपे, असे चीनला वाटते. हा समज भ्रामक आहे, याची जाणीव करून देण्यासाठी

तरी भारताने  धैर्य दाखविले पाहिजे.

चीनच्या 'एन्सर्कलमेंट'ला भारताने वेळीच प्रत्युत्तर दिले पाहिजे. मालदीव, मादागास्कर, तसेच सेशेल्सबरोबर असलेल्या संबंधात वाढ करणे, जपान, तैवान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया यांच्याशी विशेष संबंध प्रस्थापित करणे यांसारख्या उपाययोजना भारत करू शकतो. चीनभोवती भारतानेही आपला विळखा मजबूत करणे गरजेचे आहे.

**परराष्ट्र धोरणावर शांततावादी विचारवंतांची पकड**

आज इन्दीरा गांधी,सरदार वल्लभभाई पटेल यांसारखे एखादे खंबीर भूमिका घेणारे आणि कोणत्या परिणामाला सामोरे जाण्याची ताकद असणारे नेते असावेत .त्यासाठी प्रखर राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. अशी इच्छाशक्ती निर्माण होण्यासाठी जनतेनेच सरकारवर दबाव टाकायला हवा. चीनच्या घुसखोरीच्या विरोधात जनतेनेही उत्स्फूर्तपणे तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करायला हव्यात. संपूर्ण देशात चीनच्या विरोधात वातावरण निर्माण व्हायला हवे. चिनी बनावटीच्या वस्तूंवर बहिष्कार टाकायला हवा. अशा वस्तू विकणार्यांना देशद्रोही मानायला हवे. व्यापार ही चीनची सर्वात मोठी आर्थिक शक्ती आहे . त्यामुळे या देशात चिनी वस्तुंच्या व्यापारावर निर्बंध आले तर ते चीनला परवडण्यासारखे नाही.त्यादृष्टीने जनता विचार करेल ही आशा आहे.

जर तुम्हाला युद्ध टाळायचं असेल तर युद्धाकरता सक्षम व सज्ज राहा .भारताच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे की, अरुणाचल प्रदेशलगत असलेल्या क्षेत्रांमध्ये सैन्याचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. आज भारतीय सैन्य चीनबरोबर युद्ध करू शकते का? राष्ट्राने याबाबतीत चिंता करू नये. आपल्या सीमांचे संरक्षण करण्यात भारतीय सैन्य सक्षम आहे. राजकीय सामर्थ्य निर्माण करण्याची गरज आहे. चीनचा उद्देश/हेतू कधीही बदलू शकतो.

**केरनमधील लढाईचा संदेश**

पोलिसांच्या हाती लागलेला अफझल उस्मानी हा इंडियन मुजाहिदिनशी संबंधित असलेला दहशतवादी नवी मुंबई पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार होण्यात यशस्वी झाला. उस्मानी याने पलायनानंतर इंडियन मुजाहिदीनच्या दहशतवाद्यांना हाताशी धरून भारतात दहशतवादी कारवाया घडवून आणल्या तर त्याला जबाबदार कोण? मध्य प्रदेशमधील खांडवा जिल्ह्यातील तुरुंगातून 'सिमी' या दहशतवादी संघटनेचे सात दहशतवादी पळून गेले. सुरक्षा यंत्रणांचा हा हलगर्जी सामान्यांच्या जीवाला घातक ठरू शकतो.

जम्मू-काश्मीरच्या जम्मू भागातील केरान या गावात गेल्या आठवडाभरापासून घुसखोरी करून ठाण मांडून बसलेल्या पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना शेवटी हुसकावून लावण्यात आले आहे. भारतीय लष्कराने विलक्षण संयमाने पार पाडलेली ही लष्करी मोहीम आता संपली आहे. लष्करप्रमुख बिक्रमसिंग यांनी  ही घोषणा केली.

**<u>कारवाईमागे पाकिस्तानी लष्कराचा हात</u>**

काश्मीरध्ये ताबारेषेनजीक असलेल्या केरन टापूत घुसलेल्या दहशतवाद्यांच्या विरोधात गेले पंधरा दिवस चालू असलेली लष्करी कारवाई अखेर संपली आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे दहा हजार फूट उंचीवर असलेला हा पर्वतमय प्रदेश दहशतवाद्यांना अनुकूल असल्यानेच पंधरवडाभर ते लष्कराला झुंजवत राहिले. वेगवेगळ्या ठिकाणांहून दहशतवादी येत असल्याने घुसखोरीचा एक नवा 'पॅटर्न 'समोर आला. गेले पंधरा दिवस लष्कर एक छोटेखानी लढाई लढत होते. केरन टापूतच सोमवारी 'एके ४७ 'रायफलींसह शस्त्रास्त्रांचा मोठा साठाही जप्त करण्यात आला. १९९९मध्ये कारगिलमध्ये पाकिस्तानी सैनिकांनी घुसखोरी करून ठाणी ताब्यात घेतल्या होत्या. केरन टापूत गेल्या महिन्यांत तैनात सैन्याची बदली झाली. कुमाऊ पलटणीची जागा गुरखा पलटणीने घेतली. ही प्रक्रिया होत असताना ही घुसखोरी झाली.

या कारवाईमागे पाकिस्तानी लष्कराचा हात होता, ही गोष्ट निर्वविद आहे. कारण केवळ एखादी दहशतवादी संघटना भारतीय लष्कराला अशा पद्धतीने आव्हान देण्याचे धाडस करू शकणार नाही. तसे तर पाकिस्तानी लष्करसुद्धा भारताला आव्हान देऊ शकत नाही आणि म्हणून तर पाकिस्तानची सेना भारताशी उघडउघड युद्ध पुकारण्याऐवजी अशा छुप्प्या कारवाया करत असते किंवा त्या करणा-या दहशतवादी संघटनांना सहकार्य करत असते, मदत करत असते. वेळप्रसंगी जवानांची कुमक देत असते, दारूगोळा पुरवत असते. म्हणजे दहशतवाद्यांनी केलेली कारवाई असल्याचे भासवून केलेला हा उपद्व्याप पाकिस्तानच्या लष्कराच्या मदतीनेच झालेला आहे. लष्करप्रमुखांनी तसे स्पष्टपणे म्हटले आहे. एरवीसुद्धा भारत-पाकिस्तान हद्दीतून भारतात घुसखोरी करणा-या दहशतवाद्यांना पाकिस्तानचे लष्कर मदत करत असतेच. जेव्हा हे दहशतवादी हद्दीवरच्या तारांचे कुंपण ओलांडून भारतात घुसखोरी करत असतात तेव्हा पाकिस्तानचे लष्कर गोळीबार करत असते. उद्देश एवढाच असतो की, या बेछूट गोळीबारामुळे सीमेवरच्या भारतीय जवानांचे लक्ष विचलित व्हावे आणि त्यामुळे घुसखोरांना भारतीय हद्दीत घुसणे सोपे जावे. हा नेहमीचाच प्रकार असतो. अशा वेळी भारतीय जवानांना त्या गोळीबारालाही उत्तर द्यावे लागते आणि घुसखोरी करणा-या दहशतवाद्यांनासुद्धा रोखावे लागते.

केरान भागामधील झालेली ही घुसखोरी अशाच पद्धतीने झालेली होती. या दहशतवाद्यांना पाकिस्तानी लष्कराने प्रशिक्षण दिले होते आणि त्यातील काही पाकिस्तानी जवानही होते. हा पाकिस्तानच्या सहभागाचा पुरावाच म्हणावा लागेल. अशी घुसखोरी करून भारताशी संबंध बिघडवत आहेत, हे तरी शरीफ यांना समजत होते की नाही आणि ते जर खरेच शरीफ असतील तर भारतीय जवानांनी ज्याप्रमाणे या दहशतवाद्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला तसा पाकिस्ताननेही त्यांच्या बाजूने करायला हवा होता.

देशाचे संरक्षणमंत्री अँटनी हे भले गृहस्थ आहेत, चारित्र्यवान आहेत ही बाब नक्कीच अभिमानास्पद. परंतु स्वत:च्या नैतिक चारित्र्याइतकेच ते देशाच्या सुरक्षेसही जपत आहेत का?. याउलट देशाच्या सीमांपेक्षाही आपल्या चारित्र्याचे जतन करणे हे अँटनी यांना अधिक महत्त्वाचे

वाटते की काय, असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे. गेल्या काही महिन्यांतील घटना तेच दर्शवतात. अलीकडच्या काळात भारतीय लष्करावर पाकिस्तानी सैन्याकडून जे काही हल्ले झाले त्याची गंभीर दखल संरक्षणमंत्र्यांनी घेतल्याचे वृत्त आहे. पण म्हणजे काय? संरक्षणमंत्री गंभीर दखल घेऊन तितक्याच गांभीर्याने आपले कर्तव्य पाडतात काय, हा प्रश्न आहे. आपली प्रतिमा जपण्यापेक्षा लष्कराचे मनोधैर्य वाढेल, अशी खंबीर कृती त्यांनी करणे गरजेचे आहे. लष्कराचे रक्षण हीच आपली जबाबदारी आहे, हे अँटनी यांना सांगण्याची वेळ आली आहे.लष्कराचे आधुनिकीकरण अँटनीमुळे पूर्णपणे बंद पड्ले आहे.

**<u>आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांचा केंद्रबिंदू पाकिस्तान</u>**

पूँछमध्ये ५ ऑगस्ट रोजी घडलेल्या प्रसंगाने हल्ल्यास पाश्र्वभूमी होती ती पंतप्रधान मनमोहन सिंग आणि पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्या न्यूयॉर्क येथे होऊ घातलेल्या चर्चेची. तो मुहूर्त साधून भारतीय लष्करावर हा हल्ला केला गेला. नेहमीप्रमाणे आपले सैनिक यात नाहीत असा दावा पाकिस्तानने केला .तो नेहमीप्रमाणेच असत्य होता. भारत आणि पाकिस्तान सीमेवरील हिरानगर परिसरात खोलवर घुसून पाकिस्तानी सैनिकांनी वा पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी आपण काय करू शकतो याची चुणूकच दाखवून दिली. केरनमधील संघर्षाची व्याप्ती कारगिलइतकी मोठी नव्हती. केरनमधील ही धुमश्चक्री सुरू होत असताना अमेरिकेत भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या पंतप्रधानांची बैठक झाली होती. दोन्ही देशांत मैत्रीचे आणि शांततेचे संबंध निर्माण होण्यासाठी चर्चा करण्यावर उभय नेत्यांनी संमती दर्शविली.भारताला एकीकडे चर्चेत गुंतवून दुसरीकडे काश्मीरमध्ये दहशतवाद्यांना फूस देण्याचे पाकिस्तानचे डावपेच काही नवीन नाहीत. भारताबरोबरील थेट युद्धांत पराभवच पत्करावा लागल्याने पाकने छुप्या युद्धाचा मार्ग अवलंबला त्यालाही आता दोन दशके लोटली आहेत. काश्मीरमधील फुटीरतावाद्यांना केवळ चिथावणीच न देता , त्यांना लष्करी प्रशिक्षण देण्याचे कारस्थान पाक गेल्या अनेक वर्षांपासून करतो आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांचा केंद्रबिंदू पाकिस्तानात आहे , हे भारत जगाला सांगतो आहे , पण त्याने फ़ारसा फ़रक पड्लेला नाही.अगदी ठरवून, विचार करून स्वीकृत केलेला मार्ग निश्‍चित झाला आहे. ‘ते’ आमच्या सैनिकांना मारणार आणि तरीही आम्ही चर्चा जारीच ठेवू. चर्चेचा उद्देश, त्याचा अजेंडा, त्यातून काय फलित होणार, पुढे काय होणार या केवळ गौण, दुय्यम बाबी आहेत. (काहीही झाले तरी) चर्चा सुरूच राहील.

**<u>दहशतवादी संघटना गैरफायदा घेतील</u>**

भारतात निवडणुकांचा हंगाम सुरू झाला आहे. येत्या महिन्यात पाच राज्यांत विधानसभा निवडणुका होत आहेत. त्यानंतर चार-पाच महिन्यांनी लोकसभेची निवडणूक होईल. निवडणुकांच्या प्रचाराचा धुरळा जसा उडेल , तसा मतपेढ्यांच्या राजकारणालाही ऊत येईल. भारतविरोधी शक्ती  दहशतवादी आणि पाकस्थित मूलतत्त्ववादी संघटना याचा गैरफायदा घेऊ शकतात. काश्मीरमध्ये घुसखोरी करून युद्धसदृश स्थिती ते निर्माण करू शकतात. त्याचबरोबर

अफवा निर्माण करून जनभावना प्रक्षोभित करू शकतात.पाकिस्तानात नवाझ शरीफ यांच्या नेतृत्वाखाली लोकनियुक्त सरकार असले , तरी लष्कराची शक्ती कमी झालेली नाही. तेथील सत्तेचा ' रिमोट कंट्रोल ' अजूनही लष्कराच्याच ताब्यात आहे.. केरनमधील कारवाई १५ दिवसांनंतर संपली तरी पाकिस्तानी लष्कराने घुसखोरी करून कुरापत काढण्यासाठी काढलेली ही क्लृप्ती भारतीय लष्करासाठी, राजकारण्यांसाठी मोठा धडा आहे. भारताने आणि भारतीय लष्कराने अधिक सावध असणे आवश्यक आहे.. केरनमधील ताज्या लढाईचा हाच संदेश आहे.

## <u>चीन दौऱ्याने काय साधले? जैसे थे स्थितीच कायम राहणार07 OCT</u>

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग २२-२४ ऑक्टोंबर चीनच्या दौर्यावर होते. त्यामधून काय निष्पन्न झाले? गेल्या १० वर्षांतील त्यांची चीनच्या वेगवेगळ्या पंतप्रधानांबरोबरची ही १७ वी भेट होती. चीनच्या आक्रमक वागणुकीमुळे भारती -चीन संबंध सध्या सर्वात खालच्या पातळीवर पोहचले आहेत. या भेटीमध्ये चीन भारतामधील खर्या समस्या, जसे की सीमा विवाद, भारतीय सिमेमध्ये घुसखोरी, पाकिस्तानला शस्त्र आणि अणुशस्त्र पुरवठा, भारताच्या शेजारील देशांमध्ये मिलीटरी बेसेस किंवा टेहाळणी केंद्रे उघडणे, आपल्या देशातील आर्थिक घुसखोरी यावर अजिबात चर्चा झाली नाही.

<u>चिनी नागरिकांसाठी पायघड्या</u>

आंतरराष्ट्रीय करारानुसार दोन देशांमध्ये समान व्यवहार तेव्हाच होतो, जेव्हा दोन्ही देश समानतेचे पालन करण्याची पूर्णपणे हमी देतात. चीनने भारतीय व्हिसा नाकारायचा आणि भारताने मात्र चिनी नागरिकांसाठी पायघड्या घालायच्या हे भारतासाठी लज्जास्पद आहे.चीनच्या स्टॅपल व्हिसामुळे किती अपमानित व्हावे लागते, किती हेलपाटे खावे लागतात, हे अरुणाचल आणि लगतच्या राज्यांतील नागरिकांना जाऊन विचारा. म्हणजे त्यांचे दु:ख दिल्लीत कळेल. अरुणाचलचे मुख्यमंत्री स्वत: दिल्लीत येऊन पंतप्रधानांसमोर आपली व्यथा मांडतात. त्यामुळेच शेवटच्या क्षणी उभय देशातील सुलभ आणि मुक्त व्हिसा प्रक्रियेचा मुद्दा करारातून वगळण्यात आला.

यावरून चीनची भूमिका बदलेल असे सध्या तरी वाटत नाही. चीनसोबत बरोबरी करणारा, किंबहुना चीनपुढे जाण्याची स्वप्ने पाहणारा भारत चीनपुढे कसा हतबल आहे, हे संपूर्ण जगाने पाहिले. पंतप्रधान असे म्हणाले की, जेव्हा भारत आणि चीन

एकमेकांशी हात मिळवितात, तेव्हा जगाचे लक्ष त्याकडे वेधले जाते. जगाचे लक्ष वेधले जावो अथवा न जावो, भारताचे लक्ष नेहमी भारताचे राष्ट्रपती किंवा पंतप्रधान जेव्हा चीन भेटीवर जातात, तेव्हा त्याकडे लागलेले असते. आज चीनला आपण भारताची बाजारपेठ मुक्तपणे खुली केली आहे. भारतीय उद्योजकांनीही चीनमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. पण, केवळ व्यापारविषयक करार केल्याने सर्व प्रश्न सुटले असे होत नाही. देशाचे सार्वभौमत्व, सन्मान, परस्पर सहकार्य हेही तेवढेच महत्त्वाचे असते. भारताच्या दीर्घकालीन सामरिक, अंतर्गत सुरक्षा, आमच्या सीमा आणि विकासाच्या अनेकविध मुद्यांवर परिणाम करणाऱ्या या बाबी आहेत.

<u>चिनी बनावटीची शस्त्रे मोठ्या प्रमाणात</u>

भारताला नक्षलवाद्यांचा धोका हा दहशतवादापेक्षाही अधिक आहे, असे आपले पंतप्रधान अनेकदा बोलले. आज अनेक राज्यांमध्ये नक्षलवाद्यांकडून जी शस्त्रास्त्रे जप्त केली जातात, त्यात चिनी बनावटीची शस्त्रे मोठ्या प्रमाणात आहेत. चीनची ही शस्त्रे नेपाळमार्गे बिहार आणि उत्तरप्रदेशात येतात आणि तेथून ती नक्षलवाद्यांपर्यंत पोहोचविली जातात, असे इंटेलिजन्स ब्युरोचे अनेक अहवाल आले. केवळ चीनच नव्हे तर पाकिस्तानसुद्धा काश्मीर खोऱ्याव्यतिरिक्त नेपाळचाच वापर नक्षल्यांना शस्त्रे पोहोचविण्यासाठी करतो, असेही लक्षात आले आहे. आज चीनची नेपाळवर मेहेरनजर आहे. एकेकाळी आपला मित्रदेश असलेला नेपाळ आज आपलाच शत्रू झाला आहे.

चीनच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू हिंसा आणि विस्तारवादाचा आहे, परराष्ट्र धोरणाची आखणी करताना, आपल्या देशाचे सार्वभौमत्व हे सर्वोपरी असले पाहिजे. सहकार्याचा हात पुढे करताना, दुसऱ्या बाजूनेही तेवढ्याच मजबूतपणे सहकार्य केले पाहिजे हे आपण डोळसपणे पहायला हवे. चीनला जवळ करून अमेरिकेची अवहेलना ही भविष्यात भारताला महागात पडू शकते.

<u>बहुतेक करारांमध्ये एका नव्या कलमाची भर</u>

पंतप्रधानांच्या दौऱ्यात भारत आणि चीनदरम्यान नऊ करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. पण, हे करार म्हणजे आधीच्या बहुतेक करारांमध्ये एका नव्या कलमाची भर असेच

त्याचे स्वरूप आहे. ब्रह्मपुत्रा आणि सतलज या नद्यांवर चीनने  धरणं बांधली आहेत. या धरणातून एकाच मिनिटात कोट्यवधी गॅलन पाणी सोडले जाते. त्यामुळे महापूर येतो आणि त्याचा फटका भारताला बसतो. यासंदर्भात २००८ आणि २०१० मध्ये एक करार झाला होता. त्यात जून ते ऑक्टोबर या कालावधीतील पूरस्थितीची माहिती चीनने भारताला देण्याचा करार झाला होता. नव्या जोडलेल्या कलमात एवढेच म्हटले आहे की, आता जूनऐवजी मे पासून पूरस्थितीची इत्यंभूत माहिती (फ्लड डाटा) चीन भारताला देईल. आकस्मिक स्थिती उद्भवली तर चीन काय करीत आहे आणि भारताने काय केले पाहिजे हे कळविले जाईल.

भारतीय सीमाभागात काही दिवसांपूर्वी चीनने आपले तळ स्थापन केले होते. त्यामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली होती. हा मुद्दा कराराचा एक विषय होता. त्यावर चीनने अगदी मनापासून सहकार्य करण्याची तयारी दाखविली का? करारात काय म्हटले आहे ?. भारत आणि चीनच्या सीमाभागात भारत आणि चीनचे सैनिक आपापली गस्त घालतील. त्याला कुणीही आडकाठी आणणार नाही. दोन्ही देशांनी एकमेकांवर कुरघोडी होईल, वातावरण स्फोटक होईल, अशी कोणतीही कृती करू नये. जर... या जरमध्येच खरी गोम आहे. जर एखादी शंकास्पद स्थिती निर्माण झाली तर खुलासा मागविण्यात येईल. मागे देपसांग येथे निर्माण झालेल्या स्थितीसारखी वेळ आली तर दोन्ही बाजूंनी संयम पाळून कारवाई करावी. पण, भडकावणारी, बळाची धमकी देणारी कारवाई होणार नाही, शस्त्रांचा अतिरेकी वापर होणार नाही, याची काळजी घ्यावी.

जैसे थे स्थितीच कायम राहणार

याचा अर्थ काय? म्हणजे, थोडक्यात जैसे थे स्थितीच कायम राहणार आहे. आमचे सैन्य थोडासा संयम पाळतील, एवढाच चीनचा संदेश यात आहे. आणखी एक करार आहे. तो सीमेबाबत आहे. यात काही मुद्दे नव्याने जोडण्यात आले आहेत. दोन्ही देशांची लष्करी मुख्यालये हॉटलाईनशी जोडली जाणार आहेत. चेंगडू आणि लानझोऊ या सीमेवरील दोन भागातील दोन्ही देशांचे लष्करी कमांडर हे नियमितपणे संवाद साधतील. दोन्ही देशांच्या फ्लॅग मीटिंगची संख्या वाढविण्यात येईल. दोन्ही देशांच्या

संरक्षण मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांच्या एका विशिष्ट कालावधी ठरवून बैठका होतील. सीमाभागावर चर्चा करण्यासाठी उभय देशांच्या परराष्ट्र मंत्रालयस्तरीय बैठका, संरक्षण सचिव स्तरावरील बैठक वर्षातून एकदा असे काही मुद्दे जोडण्यात आले आहेत.

एक नवा करार प्रथमच झाला आहे. त्यात शस्त्रे आणि वन्यप्राण्यांच्या अवशेषांच्या तस्करीवर प्रतिबंध, लष्करी कवायतींची परस्परांना आगावू माहिती अशा यात तरतुदी आहेत. आणखी एका करारानुसार उभय देशांचे सीमेवरील सैनिक त्या त्या देशाचे राष्ट्रीय दिन, उत्सव, खेळ यात सहभागी होणे जेणेकरून वातावरण निवळण्यास मदत होईल.

हा या करारांचा गोषवारा आहे. भारत नेहमी अशा सर्वच देशांसोबत केलेले करार तंतोतंत पाळत आला आहे. प्रश्न आहे, चीन या करारांचे पालन करणार का? चीनसोबत भारताने यापूर्वीच अनेक करार केले आहेत. पण, चीनने त्यापैकी अनेक करारांचा भंग केला आहे. भारतावर चीन सतत दबाव निर्माण करत असतो.

**जपान व्हिएतनाम कसे वागतात?**

आशियात जपान व भारत हे चीनला आपले प्रतिस्पर्धी वाटतात. जपानशी कुरापत काढली आणी जपाननी आपले एयरफ़ोर्स अलर्ट केले.चीनने व्हिएतनामवर दबाव टाकला, व्हिएतनामने आपला शत्रू असलेल्या अमेरिकेशी मैत्री प्रस्थापित केली.लडाखमधील चिनी लष्करी अतिक्रमणाला, छोटे समजणे धोकादायक ठरणार आहे. असे प्रोत्साहन मिळत राहिले, तर घुसखोरीबाबत चीनला काळजी करण्याचे कारणच उरणार नाही. तिन्हीं देशापैकी भारताची कुरापत काढणे सोपे, असे चीनला वाटते. हा समज भ्रामक आहे, याची जाणीव करून देण्यासाठी तरी भारताने धैर्य दाखविले पाहिजे.

चीनला भारतासोबत फक्त व्यापार हवा आहे

भारताची अगदी खेळण्यापासूनची बाजारपेठ आज चीनने काबीज केली आहे. त्यामुळे लाखो ग्रामीण आणि कुटिरोद्योग बंद पडले. लक्षावधी कामगार बेकार झाले. भारताला चीनवर व्यापारविषयक दबाव निर्माण करता येईल का? कारण, तेच चीनचे खरे दुखणे आहे. दुसऱ्या देशाला भारतात पाचारण करून स्वत:च्या देशवासीयांचा राग आणि

संताप ओढवून घेणे हे कोणत्याही समजूतदार देशाचे लक्षण नाही. आज अरुणाचल, सिक्कीम, लडाख या प्रांतात चीनच्या हेकेखोरीमुळे प्रचंड असंतोष आहे. हा असंतोष शांत करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. भारताची जर अशीच बोटचेपी भूमिका राहिली, तर त्याची किंमत भारतालाच मोजावी लागणार आहे.